सकाळ

# फलटणचा महिला संघ व्हॉलिबॉलमध्ये उपविजेता

## कोल्हापूर विभागीय स्पर्धा; मान्यवरांकडून खेळाडूंचे अभिनंदन

**सांगवी, ता. ८ :** फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय, फलटणच्या महिला संघाने कोल्हापूर विभागीय व्हॉलिबॉल स्पर्धेचे उपविजेतेपद पटकावले. या यशाबद्दल संघातील खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे (जि. रायगड) अंतर्गत कोल्हापूर विभागीय व्हॉलिबॉल स्पर्धेचे आयोजन संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालय, पन्हाळा (जि. कोल्हापूर) येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत फलटणच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील महिला संघाने व्हॉलिबॉल स्पर्धेचे उपविजेतेपद पटकावले.



**फलटण :** यशस्वी खेळाडूंसमवेत संजीवराजे नाईक- निंबाळकर व शिक्षक.

कोल्हापूर विभागामध्ये सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांतील संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामना अभियांत्रिकी महाविद्यालय, सिंधुदुर्ग संघाबरोबर अतिशय रंगतदार व संघर्षमय झाला.

फलटण अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघात आदिती राऊत, माया ढवळे, शर्वरी कचरे, नंदिनी पवार, स्नेहल तरटे, दीक्षा गायकवाड, अनुजा निंबाळकर, शोभा जाधव, श्रद्धा राऊत, अंजली पवार, गीतांजली जाधव, आरती राऊत या खेळाडूंचा समावेश होता. संघाला शारीरिक शिक्षण संचालक प्रा. टी. एम. शेंडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

विजेत्या संघाचे फलटण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आमदार रामराजे नाईक- निंबाळकर, रघुनाथराजे नाईक-निंबाळकर, सेक्रेटरी संजीवराजे नाईक- निंबाळकर, प्रशासन अधिकारी अरविंद निकम, प्राचार्य प्रा. डॉ. एन. जी. नार्वे, प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.


## खरेदी पूर्व जाहीर नोटीस

आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तमाम लोकांना विशेषतः मौजे नुने तालुका पाटण, जिल्हा सातारा या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की,

खाली परिशिष्ठामध्ये नमूद व वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे अशीलास खरेदी देण्याचे निश्चित केले आहे.

सदरील नमूद केलेल्या मिळकतीवर विद्यमान मालक यांनी दि कराड मर्चंट सहकारी संस्था मर्यादित कराड संस्थेस २,५०,०००/- रुपये (अक्षरी दोन लाख पन्नास हजार रुपये फक्त) एवढ्या रकमेसाठी दिनांक ०८/०७/२०१५ चे तारण गहाण खताने तारण ठेवलेली असून त्यावर कर्ज घेतले आहे. तसेच मौजे नने येथील विकास

